जा.क्र.: अंदाज / 5331 /२०२६
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, २ रा मजला,
सस्मिरा इमारत, सस्मिरा मार्ग, वरळी,
मुंबई – ४०००३०.
दिनांक – ०५/१०/२०२६

## परिपत्रक क्रमांक -६२६ दिनांक ०५.१०.२०२६

**विषय :** महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ३४ अन्वये लेखा विवरणपत्रे (हिशोबपत्रके) ऑनलाईन जमा करणेबाबत.

**संदर्भ :** परिपत्रक क्र.५०४/२०१७ दि. २२.०६.२०१७.

उपरोक्त संदर्भांकित परिपत्रकान्वये न्यासांनी त्यांची हिशोबपत्रके ऑनलाईन पद्धतीने दाखल करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ऑनलाईन हिशोबपत्रके दाखल करणाऱ्या न्यासांना User-Id सुद्धा देण्यात आले आहेत.

सदर हिशोबपत्रके ऑनलाईन सादर केल्यावर हिशोब पत्रकाची पोहोच पावती संबंधित जिल्हास्तरीय कार्यालयात दाखल करण्याची प्रथा (Practice) पाळण्यात येत आहे. वास्तविकतः ऑनलाईन हिशोबपत्रके दाखल केल्यानंतर त्या हिशोब पत्रकाची पोहोच पावती व्यक्तीशः संबंधित जिल्हा कार्यालयात सादर करण्याच्या सूचना संदर्भिय परिपत्रकाद्वारे किंवा अन्य कोणत्याही परिपत्रकाद्वारे जारी केलेल्या नाहीत. हिशोब पत्रके ऑनलाईन दाखल केल्यानंतरही त्याची पोहोच पावती फिजिकल स्वरूपात सादर करण्याच्या Practice मुळे विश्वस्तांना फार त्रास होत असल्याच्या तक्रारी धर्मादाय आयुक्त कार्यालयात प्राप्त होत आहेत.

करिता, सर्व न्यासांना व न्यासाचे विश्वस्तांना, सनदी लेखापाल व लेखापरीक्षक यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, ऑनलाईन हिशोबपत्रके दाखल केल्यावर त्याची पोहोचपावती संबंधित कार्यालयात फिजिकली जमा करणे यावर्षीपासून तात्काळ प्रभावाने बंद करण्यात येत आहे. धर्मादाय आयुक्त कार्यालयातील अधिकारी किंवा कर्मचारी यांनी कोणत्याही विश्वस्तांना ऑनलाईन हिशोबपत्रकाची फिजिकल पोहोच पावती सादर करणे बाबतची सक्ती किंवा मागणी करू नये. सर्व संबंधीतांनी याची नोंद घेऊन अनुपालन करावे.

05/10/2026

(अमोघ श्या. कलोती)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत:**

१ परिपत्रक धारिणी
२ सर्व संबंधित अधिकारी
३ संगणक शाखा (संकेतस्थळावर नोंदीसाठी)

Scanned with OKEN Scanner